# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

## अखिल भारतीय समन्वयीत सोयाबीन संशोधन प्रकल्प

**मुख्य सोयाबीन संशोधन केंद्र,प्रादेशीक संशोधन केंद्र,मोर्शी रोड,अमरावती – ४४४६०३ (महा.)**

डॉ. एस.एस. निचळ
प्रमुख

फोन नं. (०७२१) २९७०१७९
ई मेल- rrc_amt@rediffmail.com


---

जा.क.:प्रासंके/फळबागा/११२८/ २०२५
प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती
दिनांक- 03 / 11 / २०२५

## लिलाव सुचना

प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती येथील प्रक्षेत्रावरील चिकू फळझाडांवरील फळांची खुल्या लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे. सदर लिलाव दिनांकः-१२/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रादेशिक संशोधन केंद्र (डॉ.पं.दे.कृ.वि.), अमरावती येथील प्रक्षेत्र कार्यालयात आयोजित केला आहे.

<u>चिकू फळांच्या जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती</u>

**प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती येथील प्रक्षेत्रावरील फळझाडांवरील चिकू फळांचा जाहीर लिलाव खालील अटीनुसार करण्यात येईल.**

१. लिलावामध्ये एच विभागामधील चिकू झाडावरील फळे असतील.

२. कमीत कमी तीन किंवा त्यापेक्षा जास्त बोली बोलणारे असतील तेव्हाच लिलाव पुकारण्यात येईल.

३. बोलीमध्ये भाग घेण्यापूर्वी खरेदीदारांना बोलीत भाग घेण्याकरीता रु २००० /- (रुपये दोन हजार फक्त) रक्कम जमा करावी लागेल. व एकूण लिलाव रक्कम तिन हफत्यामध्ये भरणा करावी लागेल. सदर लिलावामध्ये बोली ही झाडावरील एकूण फळांच्या उत्पन्नाची बोलावी लागेल. लिलाव घेतला असेल त्याचे सह प्रथम तीन उच्चतम् बोली धारक सोडून इतर सर्वांची रक्कम लिलाव संपताच परत करण्यात येईल. लिलाव घेणाऱ्याच्या व्यतिरिक्त इतर दोन बोली धारकांची रक्कम, लिलाव घेणाऱ्याने पैसे भरताच परत करण्यात येईल. उच्चतम बोली बोलून लिलाव घेण्या-याने बोलीची रक्कम न भरल्यास दुस-या क्रमांकाच्या बोली धारकास लिलाव देण्यात येईल व दुस-या क्रमांकांच्या बोली धारकाने बोलीची रक्कम न भरल्यास तिस-या क्रमांकांच्या बोली धारकास लिलाव देण्यात येईल.

४. उच्चतम बोली धारकाने लिलावाच्या दिवशी रुपये २००० /- रक्कम सुरक्षा ठेव म्हणून भरणा करावी लागेल. व लिलाव तारखेपासुन ७ (सात) दिवसाचे आत एकुण लिलावाच्या एक तृतीयांश रक्कम भरणा करावी लागेल. त्याशिवाय फळे तोडता येणार नाही. ज्या दिवशी पहिली तोडणी करण्यात येईल त्या दिवशी दुसरा हफ्ता एकूण लिलाव रकमेच्या एक तृतीयांश रक्कम कार्यालयास जमा करावी लागेल. व तिसरा हफता म्हणजेच शेवटची एक तृतियांस रक्कम दुस-या हफ्त्याच्या एका महिण्यांनी कार्यालयास जमा करावी लागेल.

**५. चिकू फळाची तोडणी करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१/०५/२०२६ ही राहील. गरज भासल्यास मुदत वाढविण्याबाबत लिलाव कमेटीचा निर्णय अंतिम राहिल.**

६. लिलावाची अपेक्षित किंमत न आल्यास लिलाव कमेटी लिलाव रद्द करेल.

७. फळे तोडतांना कुठलेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. नुकसान झाल्यास त्याची भरपाई खरेदीदाराकडून करण्यात येईल.

८. लिलावाची अंतिम बोली ग्राहय झाल्यावर संबंधीत खरेदीदारास रु १००/- चे जनरल स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

९. लिलाव मंजूर झाल्यावर फळबाग राखणाची जबाबदारी, फळाची तोडणी तसेच राखणदाराचा राहण्याची व्यवस्था करणे, खते, ओलीत करणे खरेदीदाराकडेच राहील.

१०. अन्य कोणतीही मशागत विद्यापीठाचे वेळापत्रकानुसारच केल्या जाईल.

११. नैसर्गिक आपत्तीमुळे काही नुकसान झाल्यास त्याकरिता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२. कोणत्याही कारणावरून खरेदीदार व केंद्राचे अधिकारी यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय हा मा. संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा दोघांनाही बंधनकारक राहील.

१३. काही कारणास्तव बोली बोलणाऱ्यास अपात्र ठरविण्याचा अधिकार लिलाव कमेटीस राहील.

१४. संपूर्ण फळे तोडणी झाल्यानंतर लिलाव घेणाऱ्यास सुरक्षा ठेव (Security Deposit) परत मिळण्याकरिता प्रमुख, प्रादेशिक संशोधन केंद्र, मोर्शी रोड, अमरावती या नावाने अर्ज करावा लागेल व त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

१५. सुरक्षा ठेव रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१६. कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास लिलाव कमेटी नुकसान किंमत ठरवेल व सुरक्षा ठेव रक्कमेमधून कपात करण्यात येईल.

१७. उच्चतम बोली धारकाने लिलावाचे दिवशी रुपये २०००/- सुरक्षा ठेव रक्कम भरणा केला नाही तर लिलावामध्ये भाग घेण्याकरीता भरणा केलेली रक्कम रूपये २०००/- परत मिळणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही व ताबडतोब लिलावाची पुढील कार्यवाही करण्याबाबत लिलाव कमेटी ठरवेल.

प्रमुख
प्रादेशिक संशोधन केंद्र
अमरावती

प्रतिलीपी

१. **मा. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना माहिती** तथा उपरोक्त फळांच्या लिलावाच्या जाहिरातीचे प्रारूप कृषि विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करावे हि विनंती.

२. कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती यांच्या नोटीस बोर्डवर.

३. कार्यालयीन नोटीस बोर्डवर.